जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र- १०५ दिनांक :- २१/०८/२०२६

# " ईद, दहीहंडी व गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्हा पोलिसांची विशेष वाहतूक कारवाई मोहीम"

===०००===

**ईद, दहीहंडी व गणेशोत्सव हे सण उत्साहात व शांततेत साजरे होत असताना वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी, नागरिकांमध्ये वाहतुकीच्या नियमांबाबत शिस्तीची मानसिकता निर्माण व्हावी तसेच कायद्याचा धाक निर्माण होऊन रस्त्यांवरील बेशिस्त व धोकादायक वाहनचालना रोखता यावी, यासाठी पोलीस अधीक्षक मा. श्री. श्रीकांत धिवरे, जळगाव यांचे मार्गदर्शनाखाली विशेष वाहतूक मोहीम राबविण्यात आली आहे.**

**सदर मोहिमेदरम्यान जिल्ह्यातील सर्व पोलिस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उपस्थित राहून दृश्य स्वरूपात प्रभावी वाहतूक कारवाई करणार आहेत. सकाळी, सायंकाळी तसेच रात्री ११:०० वाजेपर्यंत कारवाईवर विशेष भर देण्यात आला आहे**. मोहिमेमुळे नागरिकांना पोलिसांची प्रभावी उपस्थिती जाणवेल तसेच वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांविरुद्ध तात्काळ कायदेशीर कारवाई केली जाते, असा संदेश समाजामध्ये पोहोचण्यास मदत झाली आहे.

जिल्ह्यातील **सर्व पोलीस स्टेशन, सर्व पोलीस दुरक्षेत्र तिन्ही वाहतूक शाखां तसेच महामार्ग सुरक्ष पथक यांनी** सदर विशेष मोहिमेत विशेष व भरीव कामगिरी बजावली आहे. तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील मोहिमेचे स्वतः निरीक्षण व मॉनिटरिंग करून प्रभावीपणे अंमलबजावणी केली आहे. या मोहिमेत पोलीस अधिकारी व अंमलदारांनी सक्रिय सहभाग घेतला असून, मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उपस्थित राहून **वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध प्रभावी कारवाई केली आहे**

## विशेष मोहिमेअंतर्गत करण्यात आलेली कारवाई

| अ.क्र. | जळगांव जिल्हा पोलीस दल तपशिल | एकुण केसेस |
|---|---|---|
| १. | विना हेल्मेट वाहनचालक | ८५३ |
| २. | अतिवेगाने वाहन चालविणे - कलम १८३ MV Act | ३८ |
| ३. | बेकायदेशीर पार्किंग | ५४१ |
| ४. | कलम ६६/१९२ MV Act अंतर्गत कारवाई | १३४ |
| ५. | Drunk & Drive | ४२ |
| ६. | अल्पवयीन चालक | ५८ |
| ७. | सिग्नल उल्लंघन | ४९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | ट्रिपल सीट | | ५५९ |
| ९. | Modified Silencer | | १५ |
| १०. | वाहन चालविताना मोबाईलचा वापर | | १२० |
| ११. | ट्रकला No Light / Reflector नसणे | | ७९ |
| १२. | Wrong Side Driving | | ९ |
| १३. | विना परवाना शालेय वाहतूक | | ११२ |
| १४. | शाळा / कॉलेज परिसरातील कारवाई | | १९७ |
| १५. | MIDC परिसरातील कारवाई | | १० |
| १६. | इतर MV Act अंतर्गत कारवाई | | २८५४ |
| १७. | **एकूण केसेस** | | ५६७० |
| १८. | **एकूण दंडाची रक्कम** | | **३९,७०,१५०/-** |
| १९. | **तपशिल** | **एकुण केसेस** | **एकूण दंडाची रक्कम** |
| २०. | **जळगांव जिल्हा पोलीस दल** | **५६७०** | **३९,७०,१५०/-** |
| २१. | **महामार्ग सुरक्ष पथक (HSP)** | **१४३५** | **१२,७५,४००/-** |
| २२. | **एकुण** | **७१०५** | **५२,४५,५५०/-** |

***" सणांचा आनंद घेताना नागरिकांनी वाहतुकीचे सर्व नियम पाळावेत, हेल्मेटचा वापर करावा, मद्यपान करून वाहन चालवू नये, अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास देऊ नये तसेच रस्त्यावर इतरांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होईल असे कोणतेही कृत्य करू नये. असे आवाहन मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगाव यांनी केले आहे."***

**सदर विशेष मोहिमेची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. संदीप गावीत, अपर पोलीस अधीक्षक, जळगाव तसेच श्री. अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक, चाळीसगाव, यांचे मार्गदर्शनाखाली सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी, पोलीस निरीक्षक, वाहतुक शाखा, जळगाव तसेच महामार्ग सुरक्षा पथक यांनी तसेच त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी व अंमलदार यांनी सदर मोहिमेत उल्लेखनीय कामगिरी बजावली.**

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव**

**प्रति,**

**सर्व संपादक/वार्ताहार**
**प्रिंट मिडीया/इलेक्ट्रॉनिक मिडीया**
**२/- जनहितार्थ प्रसारण करीता**






जय